चिठ्ठी



# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर  **P.S.(ठाणे):** जुना राजवाडा  **Year (वर्ष):** 2020
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0343  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/07/2020 16:15 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** शुक्रवार  **Date From (दिनांक पासून):** 17/07/2020
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/07/2020
      **Time Period (कालावधी):** पहर 4  **Time From (वेळेपासून):** 11:56 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 12:27 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 29/07/2020  **Time (वेळ):** 15:54 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
   **Entry No. (नोंद क्र.):** 021  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/07/2020 15:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 0.50 किमी
   **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** जुना राजवाडा पोलीस ठाणेचे,इमारतीसमोर, भवानी मंडप,कोल्हापूर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
   (a) **Name (नाव):** उदयसिंह शिवाजी मोरे
   (b) **Father's Name (वडील चे नाव) :** शिवाजी मोरे
   (c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985  (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   (f) **Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**
   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राशिवडे बुद्रुक,राधानगरी, जि कोल्हापूर,जुना राजवाडा,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राशिवडे बुद्रुक,राधानगरी, जि कोल्हापूर,जुना राजवाडा,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9561563233

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिकेत संताजी सरनाईक | | | 1. शाहु कालनी प्लाट नं 6,मंगळवार पेठ, कोल्हापूर,,जुना राजवाडा,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | निलेश विठ्ठल सुतार | | | 1. महेकर याचे घरी भाडयाने,,हनुमान गल्ली, टेंबलाईवाडी,करवीर, जि कोल्हापूर,जुना राजवाडा,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 29/07/2020 मी उदयसिंह शिवाजी मोरे, वय-35, व्यवसाय-होमगार्ड, रा. राशिवडे बुद्रुक, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर, म.नं. 9561563233, आज रोजी समक्ष फिर्याद देतो की,मी वरील पत्यावर कुटूंबियासह राहण्स आहे. मी दि. 08/05/2017 रोजीपासून होमगार्ड म्हणून कोल्हापूर शहर पथकामध्ये काम करीत आहे. मला होमगार्ड म्हणून कर्तव्य बजावत असतानाचा 3 वर्षांचा कालावधी पुर्ण झालेला आहे. होमगार्ड म्हणून 3 वर्षे उत्कृष्ठ सेवा बजावलेबाबत आमचे कार्यालयाकडून देणेत येणारे सर्टिफिकेट पाहिजे असलेस. तसेच होमगार्ड म्हणून पुर्ननियुक्ती पाहिजे असलेस त्याबाबत फार्म भरुण देण्यासाठी आवश्यक कागदपत्रे घेवून कसबा बावडा, कोल्हापूर येथील होमगार्ड जिल्हा प्रशिक्षण केंद्र येथे यावे असे मला आमचे कार्यालयातून कळविणेत आले होते. त्यानुसार मी होमगार्डमध्ये पुर्ननियुक्ती होणेसाठी तसेच होमगार्डमध्ये 3 वर्षे उत्कृष्ठ सेवा बजावलेबाबतचे सर्टिफिकेट मिळणेसाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे घेवून कसबा बावडा, कोल्हापूर येथील होमगार्ड जिल्हा प्रशिक्षण केंद्र येथे दि.14/07/2020 रोजी गेलो होतो. तेथे मी होमगार्डमध्ये पुर्ननियुक्तीचा फार्म भरुन त्यासोबत आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे सादर केली आहेत. तेथे मला कार्यालयीन काम करणारे होमगार्ड निलेश सुतार व अनिकेत सरनाईक भेटले होते. त्यांना मी सर्टिफिकेट व पुर्ननियुक्तीबाबत सांगून गावी निघून आलो होतो. दरम्यान दि. 16/07/2020 रोजी मला निलेश सुतार यांनी फोनवर मिस काल केला होता. म्हणून मी त्यांना फोन केला असता त्यांनी मला होमगार्डमध्ये 3 वर्षे उत्कृष्ठ सेवा बजावलेबाबत सर्टिफिकेट पाहीजे असेल तर, मला व अनिकेत सरनाईक यांना मिळून 2,500/- द्यावे लागतील, तरच आम्ही तुला सर्टिफिकेट मिळवून देतो असे सांगुन लाचेची मागणी केलेने मी त्याबाबत अन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथील डीवायएसपी श्री.आदिनाथ बुधवंत यांचेशी फोनवरून संपर्क साधुन तक्रार कळविली. तसेच होमगार्ड सरनाईक व सुतार यांनी दि. 17/07/2020 रोजी भेटणेस सांगितले असलेबाबत सांगुन दि. 17/07/2020 रोजी कार्यालयात येवुन भेटतो असे सांगितले होते. दि. 17/07/2020 रोजी मी अन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर चे कार्यालयात जावुन डीवायएसपी बुधवंत साहेबांची भेट घेतली. तेव्हा त्यांनी मला माझी ओळख विचारून त्यांचेकडील शासकीय पंचांची व माझी आपसात ओळख करून दिली. त्यानंतर मी माझा तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला. तेव्हा त्यांनी तो वाचुन पाहुन आपले कार्यालयातील सापळा पथकास त्यांचे केबीनमध्ये बोलवुन माझी, पंचांची व त्यांची आपसात ओळख करून दिली. त्यानंतर त्यांनी मला माझी तक्रार पंचांना तोंडी सांगणेस सांगितली. मी तक्रार सांगुन झालेवर माझा तक्रारी अर्ज त्यांनी त्यांना वाचणेस दिला. त्यांचे वाचुन झालेवर बुधवंत साहेबांनी व दोन्ही पंचांनी माझे तक्रारी अर्जावर सह्या केल्या. नंतर बुधवंत

साहेबांनी मला व दोन्ही पंचांना होमगार्ड निलेश सुतार व अनिकेत सरनाईक ग्रामसेवक द्रविड हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे?
याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. बुधवंत साहेबांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये नविन मेमरीकार्ड घालुन
मला व पंचांना पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर श्री.बुधवंत यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर चालु करुन तो माझे शर्टचे
आतील बाजूस गळयात अडकविला व मला आणि पंच श्री.पाटील यांना माझेकडील मोटर सायकलवरुन जुना राजवाडा पोलीस ठाणे
इमारतीमधील कोल्हापूर शहर पथक होमगार्ड कार्यालयाकडे होमगार्ड निलेश सुतार व अनिकेत सरनाईक यांची भेट घेण्यासाठी पाठविले. तेथे मी
पंच पाटील यांचेसोबत जावुन होमगार्ड निलेश सुतार व अनिकेत सरनाईक यांची भेट घेतली, तेव्हा त्यांनी माझेकडे होमगार्ड पथकामधील 3 वर्षे
उत्कृष्ठ सेवा केल्याबद्दल सर्टिफिकेट मिळवून देण्यासाठी रू.2,500/-लाचेची मागणी करून लाच रक्कम लागलीच घेवून येण्यास सांगितले.
तसेच मला त्यांचे पैशाचे मागणीबाबत काय शंका असल्यास डी टी सी येथे जावुन होमगार्ड अधिकारी घोडके यांचेशी चर्चा करण्यास व माझे
सोबतचे इतर होमगार्ड कर्मचा-यांनीही पैसे दिले असल्याचे सांगितले. त्यावर मी आणि पंच पाटील असे तेथुन अन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर
कार्यालयात परत आलो. त्यावेळी श्री.बुधवंत यांनी माझेकडील डिजीटल रेकार्डर बंद करुन ताब्यात घेतला.श्री.बुधवंत साहेबांनी होमगार्ड सुतार
व सरनाई आणि माझी भेट झाली काय? आमचेत काय संभाशण झाले? याबाबत माझेकडे विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना वरीलप्रमाणे
हकीकत सांगितली. त्यानंतर श्री. बुधवंत यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर सुरू करून त्यामध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण पंच श्री. पाटील व
माझेकडून आवाज ओळखून ऐकले. त्यावेळी त्यांना होमगार्ड सुतार व सरनाईक हे माझेकडे सर्टीफिकेटसाठी 2500/- रू. लाच मागत
असल्याची खात्री झाली. त्यानंतर मी होमगार्ड ट्रेनिंग सेंटर येथे अधिकारी घोडके यांची भेट घेवुन होमगार्ड सुतार व सरनाईक यांनी मागितलेल्या
लाचेबाबत चर्चा करणार असल्याचे सांगितले. तेव्हा बुधवंत साहेबांनी मला व पंचांना परत सुचना दिल्या व माझे गळयात व्हाईस रेकार्डर चालु
करून अडकवुन आम्हाला माझे मोटर सायकलवरून डी टी सी येथे अधिकारी घोडके यांची भेट घेण्यासाठी पाठविले. तेथे मी पंचांसह जावुन
अधिकारी घोडके यांची भेट घेवुन अन्टी करप्शन कार्यालयात परत आलो होतो. त्यानंतर होमगार्ड सरनाईक व सुतार यांनी लाच रक्कम फोन
करून लागलीच घेवुन येण्यास सांगितले असलेने श्री.बुधवंत यांनी लागलीच होमगार्ड सरनाईक व सुतार सांगतील त्याठिकाणी सापळा कारवाई
आयोजित करणेचे ठरविले.श्री.बुधवंत साहेबांनी त्यांचे केबीनमध्ये माझे व पंचांचे समक्ष सापळापुर्व पंचनामा सुरू केला. श्री. बुधवंत यांचे
सुचनेवरून मी होमगार्ड सरनाईक व सुतार यांना देणेसाठी लाच रक्कम 2,500/- रू. त्यांचेकडे हजर केली. त्या नोटांचे नंबर्स एका कोया
कागदावर लिहुन तो कागद दुसरे पंच मोमीन यांचेकडे देण्यात आला. त्यानंतर पोना माने यांनी लाच रक्कमेतील नोटांचे दोन्ही बाजुस हाताच्या
बोटाने अन्थ्रासिन पावडर लावुन त्या नोटांची अल्ट्राव्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी करून दाखविली. त्या नोटा पोना माने यांनी माझे
शर्टचे खिशामध्ये ठेवल्या. तेव्हा श्री.बुधवंत यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये नविन मेमरीकार्ड घातले. त्यांनी मला, दोन पंच व
त्यांचेसोबतचे स्टाफला सापळा कारवाईबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर श्री.बुधवंत यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर चालु करुन तो माझे
शर्टचे आतील बाजूस गळयात अडकवून मला आणि पंच नं.1 श्री.पाटील यांना माझेकडील सायकलवरुन होमगार्ड सरनाईक व सुतार हे सांगतील
त्याठिकाणी भेटणेस पाठविणेचे ठरविले. त्यानंतर डीवायएसपी बुधवंत साहेबांनी मला होमगार्ड सुतार यांचेशी संपर्क साधणेस सांगितले. त्यावर मी
त्यांना फोन केला असता, त्यांनी मला ते घरी गेले असल्याचे सांगुन सोमवारी भेटणेस सांगितले. सदरचे फोनवरील संभाषण डिजीटल व्हाईस
रेकार्डरवर रेकार्ड करण्यात आले होते. त्यानंतर बुधवंत साहेबांनी त्यादिवशी सापळा कारवाई स्थगित केली. तसेच मला सोमवार दि.
20/07/2020 रोजी सकाळी 10.00 वा चे सुमारास कार्यालयात हजर राहणेस व गोपनीयता राखणेस सांगुन माझे शर्टचे खिशात अंथ्रासिन
पावडर लावून ठेवलेली रु. 2,500/- लाच रक्कम श्री.बुधवंत यांनी ताब्यात घेतली. त्यानंतर पोना कदम यांनी माझे व पंच पाटील यांचे मदतीने
होमगार्ड सरनाईक व सुतार, तसेच अधिकारी घोडके आणि माझेत झाले संभाषणातील आवाज ओळखुन स्क्रीप्ट तयार केली. तसेच पडताळणी
कारवाईचे मेमरी कार्ड जप्त करून सापळा कारवाईचे मेमरी कार्ड पुन्हा सोमवारी वापरणेचे ठरवुन त्याप्रमाणे बुधवंत साहेबांनी दि. 17/07/2020
रोजी पडताळणी व सापळा पंचनामा केलेला होता.त्यानंतर मी सोमवारी कार्यालयात हजर झालेवर परत सापळा पुर्व कारवाई सुरू करून दि.
17/07/2020 रोजी सिलबंद केलेले मेमरी कार्ड व लाच रक्कम पोका देसाई यांचे मार्फतीने काढुन ती माझे शर्टचे खिशात ठेवली. तसेच मेमरी
कार्ड रेकार्डरमध्ये घालुन त्यामध्ये दि. 17/07/2020 रोजीची रेकार्डींग झालेली एक फाईल असल्याची माझी व पंचांची खात्री करून दिली.
त्यानंतर दि. 20/07/2020 रोजीपासुन परत जिल्हयामध्ये लाकडाऊन चालु झाला असल्याने श्री. बुधवंत साहेबांनी मला होमगार्ड सरनाईक व
सुतार यांचेशी संपर्क साधुन ते कोठे भेटतील याबाबत विचारणा करणेस सांगितले. त्याप्रमाणे मी पहिल्यांना होमगार्ड सरनाईक यांना फोन केला
पण त्यांना फोन लागला नाही. म्हणुन त्यानंतर मी होमगार्ड सुतार यांना फोन करून फोन लाऊड स्पिकर करून बोललो. तेव्हा सुतार यांनी ते
घरी असल्याचे सांगुन घोडके साहेब नाहीत बाहेर गेल्यात असे बोलले. त्यावर मी सरनाईक यांचेबाबत विचारणा केली तेव्हा त्यांनी त्याला भेटु
नको त्यांच्या मित्राला कोरोना झालाय आणि तो त्यांचे संपर्कात आहे, असे म्हणुन फोन बंद केला. त्यानंतर मी होमगार्ड सरनाईक यांना फोन
फोन करून फोन लाऊड स्पिकर करून बोललो. तेव्हा मी त्यांनी मागणी केले पैशाबाबत बोललो त्यावर त्यांनी मला निलेश सुतारशी संपर्क
करण्यास सांगितले. त्यावर मी त्यांना निलेश घरी असल्याचे सांगितले, तेव्हा त्यांनी त्यांना ताप, कण-कण असुन घसा खवखवालाय असे
सांगितले. त्यानंतर मी परत पैसे व घोडके साहेबांचा विषय काढलेवर होमगार्ड सरनाईकने पैशाचा काय विषय नाही तुझी कागदपत्रे पुर्ण आहेत ना
असे म्हणुन व त्यानंतर मी कोठे पैशाचा विषय काय बोललोय असे म्हणुन आपण लाच मागणी केली नसल्याचे भासवले. वरील तिन्ही वेळेचे माझे
व होमगार्ड सरनाईक आणि सुतार यांचेतील फोनवरील संभाषण बुधवंत साहेबांनी व्हाईस रेकार्डरमध्ये रेकार्ड करून घेतले होते. त्यावेळी होमगार्ड
सरनाईक व सुतार हे लाच मागणी केली नसल्याचे भासवत असुन ते आता माझेकडे पैसे घेतील असे वाटत नाहीत. तसेच अधिकारी घोडके यांनी
त्यांचेकडे परत यायचे नाही असे सांगितलेने तेही पैसे घेणार नाहीत याची खात्री असल्याने मी बुधवंत साहेबांना तसे सांगितले. त्यावर बुधवंत
साहेबांनी सदरचे प्रकरण बंद करण्याचे ठरविले. त्यानंतर पोना कदम यांनी माझे व पंच पाटील यांचे मदतीने होमगार्ड सरनाईक व सुतार आणि
माझेत फोनवर झाले संभाषणातील आवाज ओळखुन स्क्रीप्ट तयार केली. तसेच सापळा कारवाईचे मेमरी कार्ड जप्त करून त्याप्रमाणे बुधवंत
साहेबांनी दि. 17/07/2020 रोजी पडताळणी व सापळा पंचनामा केलेला होता. त्यानंतरही होमगार्ड सरनाई, सुतार किंवा अधिकारी घोडके
यांनी माझेशी संपर्क साधला नसल्याने मी दिलेल्या तक्रारीचे कामकाज थांबविणेस हरकत नाही असा जबाब दि. 21/07/2020 रोजी बुधवंत
साहेबाकडे लिहूण दिला आहेहोमगार्ड अनिकेत सरनाईक व निलेश सुतार यांनी माझेकडे होमगार्ड पथकामधील 3 वर्षे उत्कृष्ठ सेवा केल्याबद्दल
सर्टिफिकेट मिळवून देण्यासाठी रू.2,500/- लाचेची मागणी केली होती. त्याबाबत माझी होमगार्ड अनिकेत सरनाईक व निलेश सुतार, दोघेही
शहर पथक यांचेविरुध्द फिर्याद आहे.

13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Pramod Vishnu Jadhav(I (Inspector)) / PraJad1964613 or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14.**Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Pramod Vishnu Jadhav

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(क्र.): PraJad1964613

पोलीस ठाणे अंमलदार
जुना राजवाडा पोलीस ठाणे कोल्हापूर.